कै.आण्णारावजी पाटील शिक्षण संस्था, जि.औरंगाबाद संचलित कै.आण्णारावजी पाटील कन्या माध्यमिक विद्यालय, शिवशंकर कॉलनी, जि.औरंगाबाद शाळेचे मौ.निल्लोड फाटा, निल्लोड, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद येथे स्थलांतराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः माशास्थ ३३१७/प्र.क्र.२९७/एसएम-१
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १२ जुलै, २०१९

वाचा :

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक : माशास्थ २०१२/(५९/१२) माशि-२, दिनांक ३१ जुलै, २०१३.

संदर्भ :

विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांचे क्र.शिउसं/माध्य/स्थलां/७५८/६०/
२०१७-१८, दिनांक ५/०७/२०१७ चे पत्र

प्रस्तावना :

कै.आण्णारावजी पाटील शिक्षण संस्था, जि.औरंगाबाद संचलित कै.आण्णारावजी पाटील कन्या माध्यमिक विद्यालय, शिवशंकर कॉलनी, जि.औरंगाबाद या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक शाळेचे, मौ.निल्लोड फाटा, निल्लोड, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद येथे स्थलांतर करण्याचा संदर्भाधीन पत्रान्वये प्राप्त झालेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :

सदर प्रकरणी शासन निर्णय, दिनांक ३१ जुलै, २०१३ मधील निकषांची पूर्तता होत नसल्याने, कै.आण्णारावजी पाटील शिक्षण संस्था, जि.औरंगाबाद संचलित कै.आण्णारावजी पाटील कन्या माध्यमिक विद्यालय, शिवशंकर कॉलनी, जि.औरंगाबाद या मराठी माध्यमाच्या अनुदानित माध्यमिक शाळेचे, मौ.निल्लोड फाटा, निल्लोड, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद येथे स्थलांतर करण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१२१६५०११४१२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2019.07.12 16:54:25 +05'30'

(प्रविण मुंढे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.
३. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद
४. अध्यक्ष/ सचिव, कै.आण्णारावजी पाटील शिक्षण संस्था, जि.औरंगाबाद
५. निवडनस्ती (एसएम-१).